ISSN -2229-4406

*International Registered & Recognized*
*Research Journal Related to Higher Education for all Subjects*

# UNIVERSAL RESEARCH ANALYSIS

## REFERRED & PEER REVIEWED RESEARCH JOURNAL

**Vol. - II , Issue - V,**
**Year - III (Half yearly)**
**Sept. 2012 to Feb. 2013**

**Editorial Office :**
'Gyandev-Parvati',
R-9/139/6-A-1,
Near Vishal School,
LIC Colony,
Pragati Nagar, Latur
Dist. Latur - 413531.
(Maharashtra), India.

**Contact : 02382 -241913**
9423346913 / 9595225009
9637935252 / 9503814000

**Website**
**www.irasg.com**

**E-mail :**
interlinkresearch@rediffmail.com
visiongroup1994@gmail.com
dr kamblebg@rediffmail.com

**Publisher :**
**Jyotichandra Publication Pvt.Ltd.**
Latur, Dist. Latur - 413531. (MS)

**Price : ₹ 200/-**

**CHIEF EDITOR**

**Dr. Balaji G. Kamble**
Research Guide & Head,
Dept. of Economics,
Dr. Babasaheb Ambedkar College,
Latur, Dist. Latur. (M.S.)India.

**SPECIAL EDITOR**

**Dr. D. Raja Reddy**
Chairman, International Neuro Surjery Association,
Banjara Hill, Hayderabad (A.P.)

**EXECUTIVE EDITORS**

**Dr. Yu Takamine**
Professor, Fafulty of Law & Letters,
University of Ryukyas,
Okinawa, (Japan)

**Scott A. Venezia**
Director, School of Business,
Ensenada Campus,
California, (U.S.A.)

**Dr. E. Siva Nagi Reddy**
Director, National Institue
of Hospitality & Tourism Management,
Hyderabad (A.P.)

**Bhujang R. Bobade**
Director, Manuscript Dept.,
Deccan Archaeological and Cultural
Research Institute, Hyderabad. (A.P.)

**Dr. Omshiva V. Ligade**
Head, Dept. of History
Shivjagruti College, Nalegaon,
Dist. Latur. (M.S.)

**Dr. Khanderavaji Kale**
Dept. of Sociology, College of Arts,
Kowad, Dist. Kolhapur.(M.S.)

**Dr. Sadanand H. Gone**
Principal, Ujwal Gramin
Mahavidyalaya, Ghonsi,
Dist. Latur. (M.S.)

**Dr. Balaji S. Bhure**
Head, Dept. of Hindi,
Shivjagruti College,
Nalegaon, Dist. Latur.(M.S.)

**DEPUTY-EDITOR**

**Dr. V.J. Vilegave**
Head, Dept. of P.A.,
Shri. Guru Buddhiswami College,
Purna, Dist. Parbhani (M.S.)

**Dr. Babasaheb M. Gore**
Principal,
Smt. S.D.D.M.College
Latur, Dist. Latur (M.S.)

**CO-EDITORS**

**Dr. S.B. Wadekar**
Dept. of Dairy Science,
Adarsh College,
Hingoli, Dist. Hingoli.(M.S.)

**Sandip J. Nikam**
Dept. of English,
K.T.H.M. College,
Nashik, Dist. Nashik.(M.S.)

**Dr. Shivaji Vaidya**
Dept. of Hindi,
B. Raghunath College, Parbhani,
Dist. Parbhani. (M.S.)

**Dr. Shivanand M. Giri**
Dept. of Marathi,
Bhai Kishanrao Deshmukh College,
Chakur Dist. Latur.(M.S.)

**21**

# भारतीय राष्ट्रीय एकात्मतेसमोरील आव्हाणे

*डॉ. माणिक सोनवणे*
राज्यशास्त्र विभाग प्रमुख,
टिळक महाराष्ट्र विद्यापीठ,
पूणे, जि. पूणे

**Research Paper -Pol. Science**

**प्रास्ताविक :**

भारताच्या अतंर्गत सुरक्षेपुढे ज्या आव्हानांचा आपण आढावा घेतला त्यात धर्म, भाषा, जाती आणि प्रदेश यांच्या वरील नागरिकांच्या जडलेल्या ज्या निष्ठा असतात त्या जेव्हा निरूपद्रवी असतात तेव्हा कोणाचीच त्यांना हरकत नसते पण या संकुचित निष्ठा जेव्हा राष्ट्रनिष्ठेपेक्षा वरचढ होतात, संकुचित निष्ठांना प्राधान्य देऊ लागतात तेव्हा त्या निष्ठा राष्ट्रीय एकात्मतेला (अखंडतेला) विघातक ठरतात. अशा जमातवाद, दहशतवाद, प्रादेशिकवाद, बहुसंख्याकवाद इ. मुद्याच्या मदतीने भारताच्या राष्ट्रीय एकात्मतेसमोर प्रश्न निर्माण केले आहेत.

भारतातील विविधतेला नष्ट करून राष्ट्रात अखंडता निर्माण करता येणार नाही. विविधते मधुनच एकतेचे धागे ओवावे लागतील. सामाजिक-आर्थिक समतेच्या यशस्वितेवरती ही राष्ट्रीय अखंडता आधारीत आहे. संकुचित निष्ठांना प्रभावहीन करण्यासाठी शिक्षणाच्या विस्तारीकरणावर भर दिला पाहिजे. वैज्ञानिक दृष्टीकोन आणि बुध्दीप्रामान्यवाद भारतीय जनमनात प्रसारीत केला पाहिजे. याचा आढावा सदरच्या लेखात घेतला आहे.

प्रत्येक राष्ट्र आपल्या राष्ट्रीय हितसंबधांचे संवर्धनाचे कार्य करीत असते.'राष्टीय सुरक्षितता' ही राष्ट्रीयहित संवर्धनाची पूर्वअट आहे. राष्ट्रीय हितसंबधाच्या जोपासनेसाठी राष्ट्रीय सुरक्षिततेच्या व्यवस्थापनाला अनन्यसाधारण असे महत्व असते. या पार्श्वभूमीवर प्रत्येक देश आपल्या परराष्ट्र धोरणातून राष्ट्र उभारणीच्या कामाबरोबरोच राष्ट्रीय संवर्धानाची व संरक्षणाची काळजी घेत असतो.

'आंतरराष्ट्रीय राजकारणात प्रथमत: १९५० मध्ये श्री. जॉनर्हेज आणि रॉबर्ट जर्निस यांनी राष्ट्रीय सुरक्षा संकल्पना मांडली असली तरी श्री. अरनॉल्ड वोल्फर यांनी आपल्या 'डिस्कॉर्ड ॲन्ह कोलाबोरशन' पुस्तकात आधुनिक अर्थाने संकल्पनेसंबंधी ऊहापोह केला'१ वॉल्टर लिपमनच्या मते "एखादे राष्ट्र तेव्हाच पूर्णपणे सुरक्षित मानले जाते जेव्हा त्या राष्ट्राला आपल्या राष्ट्रीय मुल्यांच्या संरक्षणासाठी युध्द करावे लागत नाही."

राष्ट्राच्या सार्वभौमत्वाचे आणि एकात्मतेचे अंतगर्त आणि बाहयशत्रुपासुन संरक्षण करणे हेच राष्ट्रीय सुरक्षिततेचे मुलभूत उद्दीष्टे असते. 'राष्ट्रीय सुरक्षेची संकल्पना ही बहुआयामी आहे. तिची व्याप्ती केवळ लष्कर, सैन्य यापुरतीच मर्यादित नाही. त्यात तंत्रज्ञान, राजकीय, अर्थिक व सामाजिक घटकांचाही ऊहापोह होतो'२ राष्ट्रीय सुरक्षिततेबाबत (धोरणाबाबत) सुरूवातीची काही दशके केवळ परराष्ट्रधोरण, लष्करी संघर्ष, सैन्यशक्ती यांनाच भारताने अग्रक्रम दिला. मात्र राष्ट्रीय सुरक्षिततेच्या संदर्भात राष्ट्रांतर्गत सामाजिक समस्यांचा, प्रश्नांचा अंतर्भाव राष्ट्रीय सुरक्षिततेच्या चौकटीत केला नाही. म्हणून भारताच्या अंतर्गत सुरक्षे समोर अनेक आव्हाने उभी राहिली आहेत आणि ही आव्हाने राष्ट्रीय एकात्मेता निर्मितीच्या मार्गात अनेक अडथळे निर्माण करीत आहेत.

भारतीय नेतृत्वाने पाश्चात्य विचारकांच्या सुरक्षा संकल्पनेचे अनुकरण करून केवळ बाहय आक्रमणापासून सुरक्षा व्यवस्थापन करणे म्हणजे राष्ट्रीय सुरक्षा होय. असा एकांगी आशय गृहीत धरला. मात्र पाश्चात्य विचारकांची राष्ट्रीय सुरक्षा विषयक संकल्पना पाश्चात्य राष्ट्रांना गृहीत धरून झाली आहे. विविधतेने नटलेल्या भारत देशाला धरून नव्हे! कारण प्रत्येक राष्ट्रचे सामाजिक, आर्थिक, राजकीय व सांस्कृतीक संदर्भ वेगळे असतात.

**भारताच्या राष्ट्रीय सुरक्षिततेचे व्यवस्थापन :**

भारतासारख्या प्रचंड मोठ्या खंडप्राय देशाची सुरक्षितता घटना समितीच्या सदस्यानी ओळखली होती. त्यांनी भारतीय राज्यधटनेत राष्ट्रीय सुरक्षाचे मुल्य स्पष्ट दिले आहेत. त्यात प्रामुख्याने संसदीय लोकशाहीचे संरक्षण करणे, इगॅलेटरन समाज, परकीय राष्ट्रासोबत शांतता आणि आर्थिक विकास घडवून आणणे, परकीय राष्ट्रासोबत शांततापुर्ण सबध निमार्ण करणे. याशिवाय धर्मनिरपेक्षता, न्याय-समानता, बंधुता या मुल्यांना धोका म्हणजे राष्ट्रीय सुरक्षेला धोका होय'३ भारतीय राज्यधटनेतील राष्ट्रीय सुरक्षेच्या मुल्यांचे भारतीय समाजव्यवस्थेत प्रभावी बीजारोपन न झाल्यामुळे भारताच्या अंतर्गत सुरक्षे समोर मोठ अव्हान उभे राहिले आहे. त्याचा उहापोह पुढील प्रमाणे मांडता येईल.

**१) नक्षलवाद :-**

प्रस्थापित राज्य व्यवस्थेसंबधी नक्षलवादी चळवळीची अत्यंत संकुचित भूमिका आहे. त्यांची ही भूमिका त्यांच्या या 'ये आझादी झुटी है । लुटोरों की चांदी है ।' घोषवाक्यातून कळते. भारताच्या

ISSN 2229-4406
Vol. II, Issue :V, Sep. 2012 to Feb. 2013


सुरक्षेला सर्वाधिक धोका हा नक्षलवादाकडून आहे.नक्षलवाद भारताच्या ९ राज्यातील ७२ जिल्हात अस्तिवात आहे. विशेषत: आंध्रप्रदेश, बिहार, आणि झारखंडमध्ये बहुसंख्य जिल्ह्यात नक्षलवादी कारवाया वाढलेल्या आहेत. तथापी छत्तीसगढमधील ०८, ओरिसामधील ०९ आणि महाराष्ट्राती ०४ जिल्ह्यात या चळवळीचे काम जोमाने सुरु आहे. या घटक राज्यातील विकास कामाची कंबरडेच मोडले आहे. नक्षलवादाच जाळ असलेल्या या प्रदेशात अनुसूचित जाती - जमातींची संख्या बरीच आहे. त्यांचे पारंपरिक हक्क डावल्यामुळे त्या नक्षलवादी चळवळीकडे आकर्षित झालेले आहेत.

'नक्षलवादाचा प्रश्न केवळ कायदा व सुव्यस्था पुरता मर्यादित नाही त्याच्या मुळाशी आर्थिक विषमता व शोषण यांची वस्तुस्थिती आहे. पिढयान पिढया जंगलात राहणाऱ्या जन जातीचे पारंपरिक हक्क हिरावून घेण्याचे धोरण सरकार चालू ठेवील तो पर्यंत नक्षलवादाचा बदोबस्त सरकार करू शकणार नाही'४

'हिंसा घडवणारे नक्षली अभियान व शस्त्र बळाने ते चिरडून पाहणारे सरकार दोघेही अपराधी ठरतात. सकृतदृशनी नक्षलीचळवळ मानवी हक्कांचा, सामाजिक न्यायाचा शत्रू वाटते कारण या दोन्ही बाबी साकार करण्याचा त्याचा मार्ग चुकीचा आहे. ज्यांना आयडीयालॉजी आहे त्यांना व्यवहार कळत नाही व ज्यांना व्यवहार कळतो त्यांना आयडीयालॉजी नसते हेच खरे'५

**२) दहशतवाद :-**

'दहशतवाद निर्मितीच्या अनेक कारणांन पैकी एक सांस्कृतिक कारण समाजातील भिन्न संस्कृतिचे लोक एकमेकांबरोबर आणि एकाच राजकीय छत्राखाली व एकाच न्याय व्यवस्थेखाली राहण्यास ना खुष असतात.' ६

भारत गेली चार दशके दहशतवादाचा सामना करीत आहे. २१ व्या शतकात दहशतवादाने जागतिक स्वरूप प्राप्त केले आहे. दहशतवाद भारताच्या अंतर्गत सुरक्षे पुढील मोठे आव्हान आहे. २१ शतकातील भारताची सुरूवातच दहशतादी अक्रमनापासुन झाली आहे. भारतातील मुलतत्ववादाने उर्ग रूप धारण केले आहे. हजारो निरपराध, निष्पाप जीवांचे बळी, कोटयवधी साधनसामुग्रीचे नुकसान दहशतवादी प्रवृत्तीने घेतला आहे.

'भगव्या दहतवाहीमुळे' भारतीय लोकशाही प्रतिमेला तडे गेले 'आधुनिक जिहादी (दहशतवादी) भारत जैसे उदार लोकतंत्र की उपज और लाभार्थी भी हो सकती है।'७

भारतात सीमापार दहशतवादाला परकीय राष्ट्रे खतपाणी घालत आहेत. ईशान्यभारतातील, काश्मीर मधील दहशतवाद त्यांची उदाहरणे. भारताची अर्थव्यवस्था खिळखिळी करण्यासाठी बनावट नोटांच (चलनांच) जाळ पसरवल जात आहे. नाशिक मधील मालेगांव, अजमेर आणि हैद्राबादेत झालेल्या स्फोटात भगवा-दहशतवादाचा हात असल्याचे सिध्द झाले.भगवा दहशतवादामुळे भारताच्या राष्ट्रीयच नव्हेतर अतंर्गत सुरक्षे पुढे आव्हान ऊभे राहीले आहे.

| अ.क्र. | दहशतवादी संघटना | स्थापना वर्ष | प्रमुख | दहशतवादी हल्ले वर्ष |
|---|---|---|---|---|
| १) | लष्कर-ए-तय्यबा | १९८६ | हाफिज एम सईद | मुंबई २६/११ २००८आणि सप्टे. २००२ मध्ये गुजरात अक्षरधाम मंदीर स्फोट |
| २) | जैश-ए-मोहम्मद | २००० | मौलाना मसूद अजहर | डिसे. २००१ भारतीय संसद हल्ला, जुलै २००५ अयोध्या |
| ३) | हरकत-उल-जिहादी-ए-इस्लाम | १९८९ | कारी सैफुल्लाह अख्तर | मे २००८, असाम श्रमजीवी एक्सप्रेस |
| ४) | हिज्बुल मुजाहिद्दीन | १९८९ | मोहम्मद युसूम | श्रीनगर स्फोट |
| ५) | इंडियन मुजाहिद्दीन | २००५ | अमिर रजा खान | २००८ वारानसी, दिल्ली, जयपूर आणि अहमदाबाद |
| ६) | स्टुडट्स ऑफ इस्लामिक मुव्हमेंट ऑफ इंडिया | १९७७ | सफदर नागोरी | २००६ मुंबई रेल्वे डबा, स्फोटात मदत |
| ७) | दि. युनायटेड लिबरेशन फ्रंट ऑफ असाम | १९७९ | परेश बरूआ | असाम स्फोट श्रृखंला |

(स्त्रोत इंडिया टुडे, ७ जाने. २००९)

**३) जमातवाद :-**

भारताच्या अंतर्गत सुरक्षेसमोर जमातवादाचे मोठे आव्हान आहे. '१९९८ ते २००८ या काळात भारतात जमातवादी भूमिकेचा सार्वजनिक जीवनातला वावर बराच विस्तृत झाला होता'८

उपरोक्त काळातच भाजपच्या राजवटीत ख्रिश्चन मिशनरीवर हल्ले, N.D.A. चा घटक पक्ष असलेल्या जयललिताच्या ADMK पक्षाने तामिळनाडूत धर्मांतरबंदी कायदा लागू केला, गुजरातचे हत्याकांड २००२, पुर्वीची रथ यात्रा, बाबरी मशिद, आयोध्या, मंडल आयोग विरोध इत्यादी घटनेतुन हिंदुत्ववादी संघटनांचा, भाजपा संघपरिवाराचा जमातवादी चेहरा सामोरे येतो.

गोंध्रा हत्याकांडा नंतर संपर्कमाध्यमावर हिंदुतत्ववादयांचा किती प्रभाव आहे याची जाणिव होते. पुर्वग्रह घडविण्यात जमातवादी संघटना आणि संपर्कमाध्यमे यांचा वाटा असतो. पाकिस्तानी दहशतवाद, आतंरराष्ट्रीय पातळीवरील मुस्लिम मुलतत्ववादाची चर्चा आपल्या देशातील सामाजिक रसमिसळ कशी होते याचे उदा. म्हणजे 'गुजरातच्या हिंसाचाराला कोण जबाबदार होते.?' या प्रश्नाचे उत्तर मुस्लिम अतिरेकी संघटना गुजरातच्या हिंसाचाराला कारणीभूत होत्या. यातुन संपर्कमाध्यमानी गुजरात प्रकरणी अर्धवट व दिशाभूल करणारी माहिती प्रकाशित केली. बजरंगदल, विष्व हिंदु परिषद, R.S.S., भाजपा - परिवार हिंदुत्ववादी संघटना या हिंदुजमातवादीच होत. हे मालेगाव, अजमेर व हैद्राबाद येथील बॉम्बस्फोटाच्या तपासांती सिध्द झाले यालाच भगवा दहशतवाद असे संबोधतात.

'दिवंगत सरसंघचालक मा.स.गोळवलकर यांनी त्यांच्या "विचारधन " मध्ये हिंदुना "कम्युनल"(जमातवादी) म्हणणे व ज्यांच्या निष्ठा विभागलेल्या आणि कधी कधी संशयास्पद असतात अशा लोकांच्या जोडीला नेऊन बसविणे हे अन्याय कारक आहे. अविवेकी आहे.' असे म्हटले होते. आता त्याविषयी स्वामी आसीमानंदाच्या कबुलीजबाबानंतर सबळ पुरावाच पुढे आला आहे. संघ ही सांस्कृतिक संघटना आहे. हिंदुत्व आणि दहशवाद या दोन परस्परविरोधी गोष्टी आहेत. असे सागणाऱ्यांना अता असीमानंदाच्या कबुलीजबाबावर पांघरून घालणे ही जड जात आहे. (दै. लोकसत्ता १२ जानेवारी २०११)

### ४) बहुसंख्याकवाद-प्रादेशिकवाद :

लोकशाही म्हणजे बहुसंख्येने निर्णय घेणे. मग भारतात बहुसंख्य हिंदूच्या मनासारखे कधीच का होत नाही अशी तक्रार ही हिंदू जमातवादी संघटना करीत असतात. हिंदू जमातवादयांनी लोकशाहीची व्याख्या केवळ संख्यातत्वावरती करण्यावर भर दिला. जात, धर्म, भाषा आणि प्रदेश या मुदयांच्या आधारे जी समुहभावना निर्माण होते. तिच्याशी बहुसंख्यवादाचा परस्परसंबंध असतो.ज्या ज्या भागांमध्ये एका मोठया समूहात (जात, धर्म, भाषा, प्रदेश) यांच्या आधारे बहुसंख्येमुळे व सांस्कृतिक राजकारण केले जाते. तिथे अल्पसंख्यांकाकडे दुर्लक्ष केले जाते. (उदा. महाराष्ट्रामध्ये बहूसंख्यांक मराठा प्रभावाचे राजकारण करीत असते. कारण महाराष्ट्रात मराठा - कुणबी बहुसंख्यांक आहे.)

भारतासारख्या विविधतेने नटलेल्या राष्ट्रात प्रादेशिक अस्मितेचा उदय होणे स्वाभाविक आहे. प्रादेश्कि अस्मिता आणि राष्ट्रीय अस्मिता या परस्पर पूरक असाव्यात. मजबुत राष्ट्र निर्मितीसाठी आणि एकूणच राष्ट्रीय अखंडतेसाठी अवश्यक आहे.

संकुचित प्रादेशिक अस्मिता हे भारताच्या अंतर्गत सुरक्षते पुढील एक महत्वाचे आव्हान ठरले आहे. प्रदेशाच्या मुलभूत विकासविषयक प्रश्नांकडे दुर्लक्षं करून (शिक्षण, आरोग्य, रस्ते, वीज, पाणी, रोजगार इ.) संकुचित भाषा, धर्म, संस्कृती, इतिहास इ. भाडवल करून जनभावनेला चेतवले जाते. त्यातून राष्ट्रीय एकत्मतेला तडे जातात. संकुचित अस्मिता या प्रदेशवाद निर्माण करण्यास कारणीभूत ठरतात. विशेषत: भाषावार प्रांतरचनेची मागणी, स्वतंत्र राज्याचा दर्जा मिळविण्यासाठी, चळवळी, अन्य प्रांतीयांना आपल्या प्रांतात येण्यास प्रतिबंध करणे, राज्यासाठी अधिक व स्वतंत्र राज्याची स्वायत्तेची मागणी, प्रादेशिक विकासाचा असमतोल भरुन काढण्याची मागणी आणि फुटीरतावादी चळवळी इ. मुळे प्रादेशिकवादाला चालना मिळत आहे.९

संकुचित प्रादेशिक अस्मितांना बाजुला ठेऊन राष्ट्राप्रती निष्ठा दाखविल्यास प्रदेशवादाची धार कमी होईल. या संदर्भातील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार प्रेरक वाटतात. आणि आशावाद जागवणारे आहेत. त्याच्या मते "आपण प्रथम भारतीय आणि नंतरही भारतीयच असायला हवे."

राष्ट्रीय सुरक्षेच्या चौकटीत सामाजिक विषमता (अमानवीय जातीची उतरंड) , गरिबी, दारिद्रय, आरोग्य विषयक प्रश्न, मानवी हक्कांच हनन, वाढती बेरोजगारी आणि महागाई हे प्रश्न राष्ट्राच्या सुरक्षेला सर्वाधिक धोकादायक आहेत. एकवेळेस परकिय आक्रमण आपण सैन्यबळाचा वापर करून परतावू शकतो पण अंतर्गत समस्यांशी लढा कसा देणार? या प्रश्नाच्या उत्तरावर खरेतर भारताच्या अंतर्गत सुरक्षेचे भवितव्य अवलंबुन आहे.

## संदर्भ सूची

१) अरनॉल्ड वोल्फर्स, १९६२ , नॅशनल सेक्युरिटी ॲज ॲन ॲम्बीगिअस सिम्बल, डिस्कार्ड ॲड कोलाबोरेशन, जॉन हाफकिन्स युनिर्व्हरसिटी प्रेस बाटलमोर.

२) के. सुब्रम्हमण्यम्, १९७२, ' अवर नॅशनल सेक्युरिटी, इकोनॉमिक ॲड सांयटिफिक रिसर्च फाऊडेशन' , नवी दिल्ली, पृ.क्र. ७

३) कराडे जगन, २००८, 'जागतिकीकरण भारता समोरील आव्हाने', डायमंड पब्लिकेशन, पुणे पृ.क्र.२१३

४) भोळे भा.ल., २००३, 'भारतीय गणराज्याचे शासन', पिंपळापुरे प्रकाशन, नागपूर, पृ.क्र. ४६८

५) कुंभार ना. ल., २०१०, 'मानवी हक्क, मानवी हक्क कार्यशाळा', लातूर, पृ.क्र. ३६

६) उदगावकर म.न., २००७, 'एकविसाव्या शतकातील दहशतवाद', डायमंड पब्लिकेशन, पुणे, पृ.क्र. प्रस्तावना

७) चावला प्रभु, जानेवारी २००९, 'इंडिया टुडे', पृ.क्र. १८

८) पळशीकर सुहास, २००४, 'समकालीन भारतीय राजकारण कॉंग्रेस वर्चस्व ते हिंदू-जमातवाद', प्रतिमा प्रकाशन, पुणे, पृ.क्र. २९३

९) भोळे भा.ल., २००३, 'भारतीय गणराज्याचे शासन', पिंपळापुरे प्रकाशन, नागपूर, पृ.क्र. ५६७

१०) )http:/www.nationalintigraon.org.

११) http:/www.indiansecurity.nic.in